**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
Email : info@sra.gov.in
दुरध्वनी क्र.२६५६५८००, २६५९०४०५/१८७९
फॅक्स क्र. ०२२-२६५९०४५७

परिपत्रक क्र. १४९

क्र. झोपुप्रा/सनिस/परिपत्रक/८२६/२०१५
दिनांक : २८ एप्रिल, २०१५

**विषय : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकाधारकांना सदनिकेचे वाटप पत्र देणे व झोपडीधारकांकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत सदनिका नसल्याबाबत स्वघोषणापत्र सादर करणेबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या परिपत्रकीय तरतुदीनूसार पुनर्वसन इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी त्या योजनेतील पात्र झोपडीधारकांना त्यांच्या ज्येष्ठतेनूसार सदनिकांचे वाटप सोडत पध्दतीने सहकार विभागातील अधिकाऱ्यांच्या समक्ष करण्यात येते

सदरील सोडतीनंतर तात्काळ झोपडीधारकांना सोडतीत वाटप करण्यात आलेल्या सदनिकेबाबत माहिती प्राप्त होण्यासाठी त्यांना सोडतीच्या वेळेस सदनिका वाटप पत्र संबंधित सहकारी अधिकाऱ्यांच्या सहीने निर्गमित करण्यात यावे. (जोडपत्र 'अ')

ज्या झोपडीधारकांना सदनिका वाटप झालेले आहे त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत त्याच्या मालकीची निवासी सदनिका नाही याबाबत स्वघोषणापत्र देणेबाबत सूचित करण्यात यावे. (जोडपत्र 'ब')

सदर सदनिका वाटप झालेल्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर योजनेच्या विकासकांनी सोडतीप्रमाणे संबंधित झोपडीधारकाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत सदनिका नसल्याबाबत स्वघोषणापत्र प्राप्त करुन सदनिकेचा ताबा द्यावा व त्यांच्याकडून प्राप्त झालेले स्वघोषणापत्र प्राधिकरणाच्या सहकार विभागात जमा करावेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.**

(जोडपत्र -अ)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

## -: पुनर्वसन सदनिकेचे वाटपपत्र :-

----------------------------------------------- एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

संस्थेच्या पुनर्वसन इमारतीमधील सदनिकांचे सोडतीव्दारे दिनांक --------------- रोजी ---------------------------------------------------- येथे वाटप करण्यात आले.

संस्थेचे परिशिष्ट -२ नुसार निवासी प्रयोजनार्थ पात्र असलेले श्री/श्रीमती ------------------------------------------------------------------------- संस्थेच्या मंजूर परिशिष्ट-२ अ.क्र. ----------- अन्वये सदनिका क्र.---------------------- वाटप करण्यात आली आहे. सदर सदनिका वाटप दिनांकापासून १० वर्षापर्यंत विक्री करता येणार नाही. किंवा भाडयाने देता येणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण :

दिनांक :

(------------------------)

प्राधिकृत अधिकारी तथा

सहाय्यक /सहकारी अधिकारी, श्रेणी १/२

प्रत,

१)मे.--------------------- विकासक,

त्यांना सुचित करण्यात येते की, सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर पात्र सभासदाला वाटप झालेल्या सदनिकेचा ताबा देतांना त्यांचेकडून मुंबई शहरामध्ये निवासी सदनिका नसल्याचे स्वयघोषणा पत्र विहीत नमुन्यात प्राधिकरणास सादर करावे.

२) अध्यक्ष/सचिव/प्रशासक--------------- एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,

(जोडपत्र 'ब')

# -: स्वघोषणापत्र :-

मी, श्री. ------------------ वय ------- वर्षे, भारतीय, राहणार - -----------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो की, माझे, माझ्या पती / पत्नीच्या तसेच अज्ञान मुलांच्या नावे बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे हद्दीत मालकी तत्वावर भाडे खरेदी पध्दतीवर अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वितरीत केलेला / इतर शासकीय / निम शासकीय योजनेत प्राप्त झालेला अथवा खाजगीरीत्या संपादित केलेला निवासी गाळा / निवासी भूखंड नाही.

मी सदरचे सत्य प्रतिज्ञापत्रात दिलेली माहिती माझ्या सांगण्याप्रमाणे खरी व सत्य असून, त्याच्या सत्यतेकरीता त्यावर मी माझी स्वाक्षरी करीत आहे.

हे स्वघोषणापत्र आज दिनांक ----------------- रोजी लिहून दिले.

सही ------------------------------------

नांव -------------------------------------

**प्रतिज्ञापत्र करणाऱ्याची सही**

**समक्ष :** १)

२)